Edit with WPS Office
Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-7 No. 1 July 20

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचा रावलापाणी संग्राम

प्रा.यु.जे.धगधगे,
संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग,
ग.तु.पाटिल महाविद्यालय, नंदुरबार.

**प्रस्तावना :-**

सातपुड्याच्या पर्वत राजीत वसलेला नंदुरबार जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणुन ओळखला जातो. या जिल्ह्यास गौरवशाली ईतिहास लाभला आहे. ब्रिटिशांविरोधात शिरिष कुमार सारख्या बालवीरांनी चले जाव च्या आंदोलना मध्ये भाग घेऊन, आपल्या छातीवर गोळ्या घेऊन हौतात्म्य पत्कारले आहे. त्याचप्रमाणे सातपुड्यातील अनेक आदिवासी शूरांनी देखील लढा दिला आहे. त्यात नंदुरबार जिल्ह्यातील रावलापाणी संग्राम चे विशेष महत्व आहे. हा संग्राम महात्मा गांधी नी भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्या साठी पुकारलेल्या चले जाव चळवळीला बळ देणारा ठरला. 2 मार्च 1943 मध्ये झालेल्या या संग्रामात 15 जणांना वीरमरण आले होते. आप की जय या समाजाचे संस्थापक आप श्री संत गुलाम महाराज आणि त्यांच्या पश्चात आप धर्माची धुरा सांभाळणारे संत रामदास महाराजांनी या लढ्यास पाठिंबा देत प्रत्यक्षात इंग्रजांना आव्हान देण्याचे ठरविले. हे आव्हान सशस्त्र नसून सविनय होते. परंतु बिथरलेल्या इंग्रजांनी या लढ्यास बेछुट गोळीबार करुन चिरडून काढले. हा संग्राम इतर लढ्यांच्या मानाने दुर्लक्षित राहिला.

रावलापाणी संग्राम हा नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या झुंझारपणाचे दर्शन घडवणारा आहे. त्याचप्रामाणे तो ब्रिटिश विरोधातील असल्यामुळे स्वातंत्र्या साठी प्रसंगी आपली जीवाची पर्वा न करणारा आदिवासी ह्या लढ्यातून बघावयास मिळतो.

**उद्दिष्ट :-** रावलापाणी संग्राम अभ्यासणे.

**गृहितक :-** रावलापाणी संग्राम हा ब्रिटिश विरोधातील स्वातंत्र्य संग्राम होता.

**नंदुरबारची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

श्रीकृष्णाच्या पदस्पर्शाने पावन झालेला नंदुरबार जिल्हा आकाराने इतर जिल्हयांच्या तुलनेने लहान असला तरी अनेक वैशिष्टयांनी समृध्द आहे. प्राचीन काळी हा प्रदेश कृषिक म्हणुन ओळखला जाई .रामायण,महाभारत व सुदेश कुमार चरित्रामध्ये तसे उल्लेख आढळतात. त्यानंतर यादव काळात राजा सेदुनचंद्राच्या नंतर सेदुनदेश या नावाने ही प्रचलित होता. महाभारताच्या भिष्म पर्वात विविध प्रदेशांचा गोमाता , मंदळा , खंडा , विदर्भा व रूपवाहिका असा उल्लेख आढळतो. त्यातील खंडा म्हणजे कृष्णाचा देश असा होता. आज ही नंदुरबार शहराचा उल्लेख ' नंदनगरी ' या नावाने करतात.[१]

1845 मध्ये नंदुरबारला भिल्ल एजन्सी निर्माण करण्यात आली. 1869 मध्ये खान्देश एक स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्यात येऊ न त्याचे केंद्र धुळे होते. मोगल, मराठे आणि इंग्रज असे अनेक शासकांनी या भागावर राज्य केले असल्यामुळे भाषेची धर्माची आणि संस्कृतीची सरमिसळ येथे पहावयास मिळते. 17 व्या शतकाच्या उत्तरार्धा पासुन ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या भागात धर्माचा प्रसार व प्रचार केला. आजही तोरणमाळ या अति दुर्गम भागात 150 वर्षापूर्वी


Copyright • 2020 Authors

Edit with WPS Office

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-7 No. 1 July 2020

बांधलेले चर्च पहावयास मिळते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नंदुरबारचे मोठे योगदान आहे. 1942 च्या ' चलेजाव ' आंदोलनात बालकांनी देखील सक्रिय सहभाग नोंदवला, याविरूध्द इंग्रजांनी गोळीबार केला. त्यात शिरीष कुमार मेहतासह 5 बालके शहीद  झाली. याच चळवळीचाच पुढचा भाग म्हणजे आदिवासी संत रामदास महाराज यांनी आपल्या अनुयांसह चले जाव चळवळीला पाठींबा देत ब्रिटिशांनी केलेली हद्द्पारीची शिक्षा केलेली असतांना देखिल त्याला न जुमानत त्यांनी खान्देशाकडे येण्याचा निर्णय घेतला. याचेच पुढे रावलापाणी संग्रामात पर्यावसन झाले.

रावलापाणी संग्रामाचा इतिहास :-

आदिवासींचा इतिहास हा आजही उपेक्षित आहे. त्यांनी केलेले कार्य आणि दिलेले बलिदान हे सामान्यांपर्यंत पोहोचले नाही. ब्रिटिश काळात भिल्ल इंग्रजांना जुमानत नाही. त्यांच्यावर केलेल्या कठोर कारवाईने त्यांच्यातील बदला घेण्याची प्रवृती उफ़ाळते असे मत होते. त्यामुळे ब्रिटिशांनी भिल्लांना शक्य तितके मुख्य प्रवाहापासुन दुर ठेवण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिशांच्य दरबारी आदिवासींची नोंद ही डाकू, लुटारू अशी होती. त्यामुळे आदिवासींवर होणारे अत्याचारा बाबत बघ्याची भूमिका घेणे त्यांनी पसंत केले.

अश्या स्थितीत तळोदे तालुक्यातील मोरवड गावी गुलाम महाराजांचा जन्म झाला. त्यांनी तत्कालीन भिल्ल समाजाच्या केविलवाणी स्थिती वर चिंतन केले. या स्थितीतुन आपल्या समाजाला बाहेर काढ़ण्यासाठी त्याची अवहेलना व अवनती रोखण्यासाठी त्यांनी मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था, दारुची गुलामगिरी, एकमेकांप्रती असलेला आदराचा अभाव, आरोग्याप्रती असलेली अनास्था यामुळे त्यांच्यात एकसंधता नव्हती. त्यामुळे त्यांचे प्रस्थापित तसेच ब्रिटिश द्वारा असे दुहेरी शोषण होत होते.

यावर उपाय म्हणुन संत गुलाम महाराजांनी दहा सुत्रे (दश सुत्री) वर अमंल करण्याचा उपदेश दिला. आप मंडळाची स्थापना 11/02/1937 मध्ये झाली. यामुळे आदिवासी मध्ये जागृती निर्माण होण्यास, संघटित होण्यास सुरुवात झाली. मात्र यामुळे प्रस्थापित आणि ब्रिटिशांना हादरा बसला. परंतु 19/07/1938 मध्ये संत गुलाम महारांचे देहवसान झाले. त्यानंतर त्यांचे लहान बंधू आप श्री संत रामदास महाराज यांनी आपधर्माचे कार्य पुढे चालवले. प्रस्थापितांच्या वाढत्या विरोधामुळे 30/10/1941 पासुन आपधर्माच्या सामुहिक आरतीवर बंदी आणली. ती वाढवण्यात येऊन 23/04/1942 पासून्न संत श्री रामदास महाराज व त्यांच्या अनुयायांवर तत्कालीन पश्चिम खान्देश जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश काढण्यात आले.

रावलापाणी संग्राम :-

आप श्री संत रामदास महाराज मध्यप्रदेशात आपली हद्दपारीची शिक्षा भोगण्यासाठी मुक्कामाला होते. तो काळ महात्मा गांधींनी पुकारलेल्या चले जाव चळवळीचा होता. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीचा माहोल सर्वदुर होता. जन सामान्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात चळवळीला मिळत होता. पश्चिम खान्देश जिल्ह्यातील वातावरणही भारले जावे, आदिवासींनी मोठ्या संख्येने रस्त्यावर यावे, यासाठी तत्कालीन कॉंग्रेसचे पुढारी प्रयत्नरत्न होते. संत रामदास महारांजाचे आदिवासी समाज बांधण्याचे काम आणि त्यांच्या मागे असलेल्या आदिवासी समाजाची ताकद कॉंग्रेस जनांना ज्ञात होती. या जिल्ह्याचे वातावरणही तापावे, चले जाव चळवळ आदिवासींमध्ये रुजावी, यासाठी संत रामदास महाराजांना हद्दपारीच्या शिक्षेची मुदत


Copyright • 2020 Authors

Edit with WPS Office

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-7 No. 1 July 2020

संपण्याची वाट न पहाता परत खान्देशात येण्यासाठी मोठा रेटा होता. शेवटी संत रामदास महाराजांनी आपल्या अनुयायांसह खान्देशाकडे निघण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याबरोबर असलेल्या सर्व समाजाने साम्राज्यवाद्यांचा विरोधातील संघर्षात सामील होण्यासाठी, महाराजांच्या खांद्याला खांदा लावून रेवा नदी ओलांडली.[2]

4 मार्च 1943 ला महाशिवरात्रीस आरतीला हजर राहून त्यानंतर चले जाव चळवळीस सक्रीय पाठींबा देण्याचा त्यांचा मनोदय होता. त्यानुसार 25 फ़ेब्रुवारी 1943 ला त्यांनी अक्राणी महालाचा किल्ला सोडला आणि ते रंजनपूरकडे निघाले. हि माहिती तळोद्याचे तत्कालीन तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळविली. यानुसार एक पोलिसांची तुकडी आप धर्मीय समाजाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पाठविण्यात आली. तर दुसरी तुकडी रजंनपूर येथिल महाशिवरात्रीच्या बंदोबस्तासाठी पाठविण्यात आली. पहिली तुकडी चे पोलिस निरिक्षक आणि स्थानिक पोलिस पाटील आप धर्मीय थांबलेल्या ठिकाणी गेले असता त्यांच्यात आणि आप धर्मीय अनुयायी यांच्यात छोटी चकमक झाली. याची माहीती पोलिसांनी वरिष्ठ पोलिस अधिकारी यांना दिली. त्यानुसार मिल्ट्री व पोलिस फ़ोर्ससह डि.वाय.एस.पि. (डेपयुटी सुप्रिटेंडेंट ऑफ़ पोलिस) संत रामदार आणि आप धर्मीय समाज मुक्कामाला असलेल्या रावलापाणी येथे पोहचले. त्यांनी रावलापाणीच्या निझरा नाल्यास चहूबाजूंनी वेढा दिला. 02 मार्च 1943 रोजी सकाळी आप धर्मीय प्रात: विधि कार्यात मग्न असतांना आणि रंजनपूरकडे जाण्याच्या तयारीत असतांना त्यांच्यावर पोलिसांकडुन गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात 15 जण मृत्यूमुखी पडलेत.

निष्कर्ष :-

पोलिस कार्यवाहीचा चिकित्सक विचार केल्यास लक्षात येते की, निझरा नाल्यात झोपड्या आणि लाकुड व पानांचा तयार केलेला मंडपात असलेले आप धर्मीय अनुयायी त्यांच्याकडे असलेल्या तीर कामठ्याच्या साह्याने नाल्याच्यावर उभे असलेले सशस्त्र पोलिसांवर हल्ला करु शकतील असे शक्य दिसत नाही. कारण तत्कालीन परिस्थितीत त्याठिकाणी घनदाट जंगले होती. त्याठिकाणी अनेक झाडे, झुडपे आणी वेली नाल्याच्या वरच्या बाजूस असतील. ज्यामुळे नाल्याच्या वर बाजूस हल्ला करणे अवघड होत असेल. यावरुन असे म्हणता येईल की, पोलिसांनी आपधर्मीय अनुयायांवर पुर्वसूचना किंवा ताकिद न देता त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला असे म्हणता येईल.

संत गुलाम महाराज आणि संत रामदास यांनी आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठी अनेक चांगले आचारसंहीता अंमलात आणल्या ज्यामुळे तत्कालीन ब्रिटिश सरकार ज्यांना अनेक आदिवासी स्वातंत्र्यवीरांनी जेरीस आणले होते. त्यांना आणखीन विरोधक तयार होणे म्हणजे त्यांच्या सत्तेस धोका निर्माण होण्यासारखे होते. अशातच आपधर्मीय समाजाने तत्कालीन स्वातंत्र्य लढ्यास पाठींबा दिल्याने ब्रिटिश सत्तेस आव्हान निर्माण होईल याची त्यांना जाणीव होती. यासाठी हे आंदोलन ब्रिटीशांनी चिरडून काढले. यावरुन रावलापाणी येथे आप धर्मीयांनी दिलेले बलिदान हे स्वातंत्र्य आंदोलनासाठी दिले असे म्हणता येईल.

संदर्भ सूची:-

1 जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन 2005-2006 जिल्हा-
नंदुरबार, जिल्हा सांख्यिकी कार्यालय,**नंदुरबार. अर्थ व सांख्यिकी**


Copyright • 2020 Authors

Edit with WPS Office

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-7 No. 1 July 2020

संचालनालय, ´महाराष्ट्र शासन पान  01.

2 टाटिया डॉ, कांतीलाल, रावलापाणी सातपुड्यातील आदिवासींचा दडलेला स्वातंत्र्य संग्राम, शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे, 2012, पान 31.


Copyright • 2020 Authors